GUANGDONG HONG KONG Life STYLE in Mumbai EXPO
时尚生活汇展·孟买
28-30 October 2010
Grand Hyatt Mumbai, Exhibition Ground
Off Western Express Highway, Santacruz (East),
Mumbai, India
www.lifestyleexpomumbai.com

Print Title: Mumbai Lakshdeep

Date: 24 Oct 2010

# हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सील तर्फे मुंबईत लाइफस्टाईल एक्स्पो




हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सील, डिपार्टमेंट ऑफ फॉरेन ट्रेड अँन्ड इकॉनॉमिक को-ऑपरेशन ऑन गुआँनडाँग प्रोव्हीन्सच्या सहकार्यातून लाईफस्टाईल इक्स्पो ईन मुंबई चे आयोजन २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान करण्यात येणार आहे. एचकेटीडीसीने शहरात आयोजीत केलेल्या एका पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली.

'एलईएम २०१०' मध्ये भारतीय कंपन्यांना हाँगकाँग आणि गुआँनगडाँग प्रोव्हीन्स (चीन) मधील दर्जेदार जीवनशैली उत्पादनांची विस्तृत रेंज उपलब्ध होणार आहे. एका अनोख्या अशा ट्रेड शोचे आयोजन भारतता पहिल्यांदाच करण्यात येत असून 'एलईएम २०१०' चा सर्व भर उच्च दर्जाची उत्पादने आणि ब्रॅन्ड्सवर असणार आहे. त्या माध्यमातून भारतीय रिटेलर्स आणि हाँगकाँग आणि गुआँगडाँग येथील उत्पादक यांच्यादरम्यान नवीन व्यवसाय भागिदारी स्थापन करण्याचे उद्दीष्ट आहे.

यावेळी बोलताना एचकेटीडीसीच्या साऊथईस्ट एशिया व इंडियाच्या प्रादेशिक संचालक लॉरेट्टा वॅन म्हणाल्या, "मुंबईतील शुभारंभाच्या लाइफस्टाईल एक्स्पोची घोषणा करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. हाँगकाँग हे आशियातील एक प्रख्यात डिझाईन केंद्र आहे आणि गुआँगडाँग हे आपल्या कौशल्यासाठी सर्वश्रुत आहे. दोन्हीचा मिळून भारतीय ग्राहकांसाठी एक अतुलनीय असा अनुभव प्राप्त होणार आहे. एलईइम २०१० मध्ये भारतीय ग्राहकांना हाँगकाँग आणि गुआँगडाँगमधील उत्पादकांना एकाच छताखाली भेटण्याची संधी प्राप्त होणार आहे. आमचा पूर्ण विश्वास आहे की या ट्रेड शोला अत्यंत आश्वासक असा प्रतिसाद मिळेल. या महिण्याच्या शेवटी आम्ही भारतीय ग्राहकांनाही भेटणार आहोत. खरेदीदारांची ऑनलाईन नोंदणी www.lifestyleexpo.com वर सुरु झाली आहे.